# ग्रामस्थांनो, ग्रामविकासासाठी मतभेद विसरा : लीना देशपांडे

## गोंदवले बुद्रुक येथे ग्रामपंचायतीतर्फे संवाद मेळावा

**गोंदवले, ता. २४ :** ग्रामविकासासाठी सर्व मतभेद विसरून ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन भारत फोर्ज कंपनीच्या सामाजिक दायित्व विभागप्रमुख लीना देशपांडे यांनी केले.

गोंदवले बुद्रुक (ता. माण) येथे ग्रामपंचायतीतर्फे आयोजित गावभेट व संवाद मेळाव्यात देशपांडे बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अश्विनी कट्टे होत्या. या वेळी भारत फोर्जचे अधिकारी जयदीप लाड, आदर्श सरपंच शहाजी क्षीरसागर, जयवंत क्षीरसागर, श्री संत गाडगे महाराज मिशनचे संचालक बाळासाहेब माने, पंचायत समिती सदस्य तानाजी कट्टे, बाळासाहेब पाटील, सयाजीराव पाटील, उपसरपंच संजय माने, पोलिस पाटील आशा भोसले, बाल हक्क अभियानचे बाळासाहेब रणपिसे, डॉ. विजयकुमार कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

देशपांडे म्हणाल्या, ''बाबासाहेब कल्याणी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या ४० वर्षांपासून आम्ही सामाजिक कामे राबवत आहोत. विकासाच्या झेंड्याखाली एकत्र येणाऱ्या गावात पाणी, रस्ते, अंतर्गत गटारे, आरोग्य व शिक्षण या मूलभूत कामांना प्राधान्य दिले जाते. आपल्या सगळ्यांचा विकास हा उपक्रम राबविण्यासाठी सर्वांनी मतभेद विसरून एकत्र यावे.''

शहाजी क्षीरसागर म्हणाले, ''गावाच्या लोकसंख्येनुसार शासनाकडून विकासकामांना मिळणारा निधी पुरेसा नसतो. अशा गावांच्या विकासासाठी भारत फोर्ज कंपनी मदतीचा हात देत आहे. यातून पारदर्शी व ठोस कामांना प्राधान्य दिले जाते. गोंदवल्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांचे सहकार्य मिळावे.''

या वेळी ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक मंडळे, महिला बचत गट सदस्या, आशा सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते. अंगराज कट्टे यांनी ग्रामविकासासाठी गरजेच्या असणाऱ्या बाबी मांडल्या. सतीश अवघडे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.




**गोंदवले बुद्रुक : गावभेट व संवाद मेळाव्यात बोलताना लीना देशपांडे.**
(फिरोज तांबोळी : सकाळ छायाचित्रसेवा)